03-05-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 5/2/2025 10:53 PM Page 1



बेकायदेशीर स्टॉल्स, अनधिकृत केबल्स वीज विभागाच्या रडारवर पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



आरसीबी प्ले ऑफचे स्थान निश्चित करणार? पान ४ वर

वेर्णा, शनिवार, ३ मे २०२५ । पाने ४ । ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 240 | Verna, | facebook.com/dainikherald | Saturday 3 May 2025 | Pages 4 | ₹ 4

# बिट्स पिलानीमध्ये ५ महिन्यांत ३ विद्यार्थ्यांच्या आत्महत्या

## संस्थेविरोधात पालक जाणार न्यायालयात | राज्य सरकारच्या हस्तक्षेपाची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड :

**मडगाव, दि. २ : झुआरीनगर येथील बिट्स पिलानी गोवा कॅम्पसमध्ये दुसऱ्या वर्षात शिकणाऱ्या कृष्णा कासेरा (वय २०, लखनऊ) या विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याची घटना गुरुवारी उघडकीस आली. पाच महिन्यांतील ही तिसरी आत्महत्या असल्याने विद्यार्थ्यांमध्ये चिंता तर पालकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. कृष्णाचे नातेवाईक मनीष पोद्दार व अमन पोद्दार यांनी पत्रकारांशी बोलताना दावा केला आहे की, पाच महिन्यांत तिसऱ्या विद्यार्थ्याची एकाच पद्धतीने आत्महत्या होणे संशयास्पद आहे. आम्ही सीसीटीव्ही फुटेज मागितले, पण दिले गेले नाही.**

गुरुवारी सायंकाळी संस्थेने कुटुंबीयांना मुलाच्या मृत्यूची माहिती दिल्यानंतर त्यांचा आक्रोश उफाळून आला. त्यांनी व्यवस्थापनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. कुटुंबीयांनी आरोप केला की, कृष्णा दीर्घकाळ फोन उचलत नव्हता, त्यामुळे त्यांनी व्यवस्थापनाशी संपर्क साधला. मात्र मृत्यूबाबत त्यांना संध्याकाळी उशिरा कळविण्यात आले.

कृष्णाचे कुटुंबीय - आई, वडील, बहीण, काका व अन्य सदस्य - गोव्यात दाखल झाले. त्यांनी



महाविद्यालय प्रशासनासमोर प्रश्न उपस्थित करत विचारले की, जर विद्यार्थी मानसिक तणावात होता, तर याची पूर्वकल्पना का देण्यात आली नाही? तसेच वसतिगृहाच्या खोलीत किंवा कॉरिडॉरमध्ये सीसीटीव्ही नसल्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला.

वेर्णा पोलिस ठाण्याचे निरीक्षक आनंद शिरोडकर यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे. घटनास्थळी पोलिस, एफएसएल पथक व पंच साक्षीदारांच्या उपस्थितीत पंचनामा करण्यात आला. विद्यार्थ्याच्या खोलीतील खिडकीच्या ग्रीलला बेडशीट बांधून आत्महत्या केल्याचे स्पष्ट झाले आहे. पोलिसांनी मृतदेह दक्षिण गोवा जिल्हा रुग्णालयात हलवला असून शवविच्छेदनासाठी शनिवारी वेळ निश्चित करण्यात आली आहे. डीवायएसपी गुरुदास कदम यांनी सांगितले की, विद्यार्थ्याच्या मृत्यूमागे कोणताही गैरप्रकार दिसून आलेला नाही. मात्र, आत्महत्येचे नेमके कारण शोधण्यासाठी चौकशी सुरू आहे. अद्याप सुसाईड नोट आढळलेली नाही.

कुटुंबीयांनी आणखी खुलासा केला की, कृष्णाने २६ एप्रिल रोजी समुपदेशकाशी संपर्क साधून आपली समस्या व्यक्त केली होती, तरीही संस्थेने पालकांना पान २ ▶

# 'कोस्ताव' चा मार्ग मोकळा; चर्चिलांची याचिका फेटाळली

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २ :** गोव्यातील माजी मुख्यमंत्री चर्चिल आलेमाव यांना मुंबई उच्च न्यायालयाने मोठा झटका दिला असून, त्यांनी केलेला 'कोस्ताव' ' चित्रपटावरील बंदीचा अर्ज न्यायालयाने फेटाळला आहे. या चित्रपटाच्या निर्मिती व प्रदर्शनास विरोध करत आलेमाव यांनी दाखल केलेल्या अपीलमध्ये, भानुशाली स्टुडिओज लिमिटेड, बॉम्बे फेबल्स मोशन पिक्चर्स आणि दिग्दर्शक सेजल शाह यांना उत्तरसंघ म्हणून नामांकित करण्यात आले होते.

आलेमाव यांनी त्यांच्या याचिकेत, वादग्रस्त चित्रपटाचा ट्रेलर, ओटीटी किंवा चित्रपटगृहांमधील प्रदर्शन, तसेच देश-विदेशात कोणत्याही माध्यमातून प्रदर्शित होऊ नये, अशी तात्पुरती मनाई आदेश मिळवण्याची मागणी केली होती.

त्यांनी न्यायालयाकडे विनंती केली होती की, चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वी ट्रायल कोर्ट, स्वत: व त्यांच्या कुटुंबाच्या उपस्थितीत चित्रपटाचे खास प्रदर्शन आयोजित करावे आणि त्याच्या मूल्यांकनासाठी तज्ज्ञ समिती नियुक्त करावी. याशिवाय, प्रतिवादींनी केलेल्या कथित मानहानीकारक कृतीसाठी व एकूण हानीभरपाई म्हणून १०० कोटी रुपयांची नुकसानभरपाईही देण्याचे निर्देश देण्याची मागणी त्यांनी केली होती.

चर्चिल आलेमाव यांच्या मते, हा चित्रपट निवृत्त सीमा शुल्क अधिकारी ' कोस्ताव' फर्नांडिस यांच्या कथनावर आधारित असून, संबंधित घटना व न्यायालयीन प्रक्रियेबाबत त्यांना अपूर्ण माहिती असल्याने चित्रपटातील मांडणी एकतर्फी आणि अपूर्ण आहे. या चित्रपटामुळे आलेमाव आणि त्यांच्या कुटुंबाची प्रतिमा मलिन होण्याचा धोका आहे, असा दावा त्यांनी केला.

त्यांनी स्पष्ट केले की, ' कोस्ताव' यांनी कधीही पान २ ▶

## निवडक

### सोनिया गांधीसह ७ जणांना नोटीस

**नवी दिल्ली, दि. २ :** नॅशनल हेराल्ड मनी लाँड्रिंग प्रकरणात दिल्लीतील एका न्यायालयाने शुक्रवारी लोकसभेतील विरोधी पक्षनेते, काँग्रेस खासदार राहुल गांधी आणि काँग्रेसच्या माजी अध्यक्ष सोनिया गांधी यांना नोटीस बजावली. काँग्रेसच्या निकटवर्तीयांसह इतर ६ जणांनादेखील नोटीस देण्यात आली आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी ८ मे रोजी होणार असल्याचेदेखील न्यायालयाने म्हटले आहे. विशेष न्यायाधीश (पीसी कायदा) विशाल गोगणे यांनी सॅम पित्रोदा, सुमन दुबे, सुनील भंडारी, मेसर्स यंग इंडिया आणि मेसर्स डोटेक्स मर्चंडाइज प्रायव्हेट लिमिटेड यांनाही नोटीस बजावली आहे. नॅशनल हेराल्ड प्रकरण हे काँग्रेस पक्षाने नॅशनल हेराल्डचे मालक असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड (एजेएल) यांना ५० लाख रुपयांच्या मोबदल्यात 'यंग इंडियनला दिलेल्या ९० कोटी रुपयांच्या कर्जाशी संबंधित आहे.

-----------------

### दिल्ली मुसळधार पाऊस; ४ बळी

**नवी दिल्ली, दि. २ :** दिल्ली, नोएडासह संपूर्ण एनसीआरमध्ये शुक्रवारी मुसळधार पावसाने हजेरी लावली. विजांच्या कडकडाट सुरू असलेल्या या पावसामुळे जनजीवन विस्कळतीत झाले आहे. अनेक सखल भागात पाणी साचले आहे. जाफराबाद कला परिसरात सुरू असलेल्या जोरदार वादळीवाऱ्यामुळे एक मोठा कडुलिंबाचा वृक्ष कोसळल्याची दुर्घटना घडली. या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला हे.मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना द्वारका जिल्ह्यातील खड्खडी नहर गावाश्रत घडली आहे.

FACTORY SALE UPTO 50% OFF

शेवटचे ३ दिवस सकाळी ११ ते रात्री ८.३०

DIVISION OF SME TRADING

१ ते ५ मे २०१५

ओल्ड जीएमसी प्रिसिंक्ट,
आयनॉक्स जवळ, हॉल जी-९ व हॉल एफ-९, ईएसजी कॉम्प्लेक्स, पणजी गोवा.



TRADE ENQUIRES : +91 9011058876 / 9901018963




The new Tiguan R-Line
**Beyond betteR**

2.0l TSI with 4MOTION | 26.04 cm Digital Cockpit Pro | 9 Airbags as standard | DCC Pro with Driving Mode selection
Infotainment System with 38.1 cm display | Level 2 ADAS with 21 features | Head-up display | IDA Voice Assistant

4EVER CARE** 4 year Standard Warranty | 4 year Road Side Assistance | 3 Free Services

Exchange through **Certified Pre-Owned**

Call 1800 102 0909    volkswagen.co.in

*Price mentioned is ex-showroom introductory price . Terms and conditions apply. Images are for representation purpose. Features and accessories shown may not be a part of standard equipment and are subject to change without prior notice. Actual colour of the car may vary. The dark shade on the glass is due to the lighting effect. **3 Free services applicable on 1 000 km, 7 500 km and 15 000 km. Only labour charges are free with servicing. To know more visit your nearest dealership.

**Authorised Dealers: Volkswagen Goa:** 38/13, Old National Highway No. 17, Porvorim, Goa - 403501. **North Goa & South Goa:** 9160680000.
**Volkswagen Goa, Margoa -** 9545534546.